# २१ व्या शतकातील महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप

**असो. प्रो. डॉ. संतोष मेंढेकर**
समाजशास्त्र, विभाग प्रमुख,
रेणूका कॉलेज, बेसा, नागपूर
मो.नं. 9860015025, 8788968622
E-mail: santoshmendhekar@gail.com

---

***सारांश :***

*एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना रूढी परंपराच्या नावाखाली दबावे लागले. याच काळात सावित्रीबाई फुले व महात्मा फुले या दाम्पत्याने शिक्षणाची दारे सर्व समाजसाठी खुली केली आणि स्त्रिया शिकू लागल्या. विसाव्या शतकात स्त्रियांना स्वत:च्या हक्काची जाणीव झाली १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्राने आंतराष्ट्रीय महिला दिनाला मान्यता दिली. १९७५ हे वर्ष आंतराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले. एकविसाव्या शतकात महिलांना अनेक आवाहनांना सामोरे जावे लागत आहे.*

*स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान प्रगतीची व विकासाची संधी उपलब्ध झाली आहे. पण तरीही सशक्त नारी सशक्त जग हे साध्य करायचे तर खेड्यतील तळागाळातील स्त्रियांना सबला करायला हवे.*

**की वर्डस** : २१वे शतक, महिला सक्षमीकरण, महिला दिन, महिला योजना, महिला कायदे, महिला आरक्षण

---

**परिचय :**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात सर्व काहि जलद गतीने होत आहे अखिल मानवजातसमूहाला या शतकात वावरताना अधिक जपून पावले टाकावी लागत आहे त्यात स्त्री जातीलाही अपवाद नाही. या बदलत्या काळानुसार स्त्रीला कौटुंबिक जबाबदारी सांभाळत स्वत:ला सक्षम करावे लागत आहे.

एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाच्या युगात महिला आत्मविश्वासाने वावरतात. नवीन जगात नारीशक्तीला महत्त्वाचे स्थान आहे. लोकांना आता त्यांच्या मुलींनी आत्मनिर्भर होऊन घेतलेली झेप पाहायची आहे. सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे योगदान आहे. स्त्रियांनी सक्षम असणे म्हणजे आर्थिक सामाजिक राजकीय बाबतीत त्यांनी आत्मविश्वासाने वावरणे होय..

स्वत:ला मिळालेल्या स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून घेणे व स्वत:चा वेगळा ठसा उमटवणे हे गरजेचे आहे. हे करताना आलेल्या आवाहनांना समर्थपणे सामोरे जाणे हे हेच सक्षमीकरण आहे. हे सक्षमीकरण त्यावेळेस खऱ्या अर्थाने साध्य होईल ज्यावेळी ते तळागाळातील बाईपर्यंत पोहोचेल.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- एकविसाव्या शतकातील बदलांचा आढावा घेऊन त्यातील नवीन आवाहनांचा अभ्यास करणे.
- महिला सक्षमीकरणाचा अर्थ समजावुन घेणे.
- महिला सक्षमीकरणासाठी आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेणे.
- महिला सक्षमीकरणासाठी जागतिक पातळीवरचे प्रयत्न भारतात झालेले प्रयत्न यांचा आढावा घेणे.
- महिला सक्षमीकरणातील मागच्या शतकात झालेले प्रयत्न जाणून घेणे. एकविसाव्या शतकात झालेल्या बदलांचे स्वरूप अभ्यासणे.

- ग्रामीण भागातील महिला, शहरी भागातील महिला, विकसित व विकसनशील देशातील महिला याबाबत महिला सक्षमीकरणाचे विविध पैलु अभ्यासणे.

**साहित्य समीक्षा :**

एकविसाव्या शतकातील महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप हा शोधनिबंध प्रस्तुत करण्यासाठी वेगवेगळ्या संदर्भ साधनांचा, वर्तमानपत्रातील अग्रलेखांचा, मासिकाचा, अनेक चांगल्या वेबसाईटचा, उपयोग करण्यात आला आहे.

याआधीच्या काळातील स्त्री जीवन जाणून घेण्यासाठी पद्मजा पाटील आणि शोभना जाधव यांचे भारतीय इतिहासातील स्त्रिया या पुस्तकाचा अभ्यास केला. महिलांचे समाजात नेमकं स्थान काय आहे याचा आढावा महाराष्ट्र टाइम्सच्या अग्रलेखातून घेता आला. अर्थकारणात महिलांचा सहभाग कसा आहे हे न्यू इंडिया समाचार या पाक्षिकातून जाणून घेतले,

विकिपीडियावरून स्त्री सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप कसे आहे सक्षमीकरणाच्या वेगवेगळ्या योजना जाणून घेता आल्या.

**संशोधन महत्त्व :**

- एकविसाव्या शतकातील बदलांचा आढावा घेणे, याच शतकातील जग आणि भारत यांची वाटचाल लक्षात घेणे,
- महिलांचे जीवन कसे आहे त्यांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याचा अभ्यास करणे.
- महिलांचा समाजकारण, अर्थकारण, राजकारण या प्रक्रियेतील सहभाग जाणून घेणे.
- महिला सक्षमीकरण करण्यासाठी त्यांचे आरोग्य महिलांविषयी कायदे त्यांना पुरवण्यात येणाऱ्या सोयीसुविधा यांचा पडताळा घेणे.
- आधीच्या काळातील स्त्री जीवन जाणून घेणे वर्तमानकाळातील स्त्री जीवनाचा अभ्यास करून भविष्यकाळात स्त्रियांच्या
- सक्षमीकरणासाठी कोणत्या योजना करता येईल हे अभ्यासता येते.

**२१व्या शतकातील भारत :**

देशाने केलेल्या प्रगतीवरुन त्या देशातील उंचावलेले राहणीमान लक्षात येते. सामाजिक आर्थिक राजकीय बाबतीत २१व्या शतकात भारत आधीच्या तुलनेत प्रगत असलेला दिसतो. देशात झालेली साक्षरता वाढ, लिंगदरवाढ, ब्रिटनला मागे सारून भारताच्या अर्थव्यवस्थेचे वाढलेले आकारमान, टिकून राहिलेली लोकशाही यावरून ही प्रगती मोजता येते.

२१ व्या शतकात वाटचाल करताना भारताला अनेक आवाहनांचाही सामना करावा लागत आहे.

**२१व्या शतकातील महिलांचे स्थान :**

२०११च्या जनगणनेनुसार भारतात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४३ इतके आहे. सर्वाधिक लिंग गुणोत्तर केरळ राज्यात तर सर्वात कमी हरियाणामध्ये आहे. भारतात २०११ च्या जनगणनेनुसार स्त्री साक्षरता ६४.६ टक्के आहे.

२१व्या शतकातील स्त्रियांचे सामाजिक राजकीय आर्थिक स्थान उंचावलेले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रियांनी चांगली कामगिरी केलेली दिसून येते. पण त्याचबरोबर स्त्री अत्याचाराच्या घटना वाढलेल्या दिसतात.

समाजाने तिला स्त्री म्हणून आखून दिलेल्या चौकटी आणि भूमिका पार पडल्यानंतर तिने काही करुन

दाखवले तर ते तिचं यश आणि कर्तृत्व थोडक्यात घर सांभाळून पुढे ती जे काही करेल ते छान. घर नं सांभाहता फक्त स्वताच्या कामासाठी झोकून दिले तर लग्न न करण्याची अपेक्षा किंवा लगन मोडकळीस येईल हे गृहीतक

२१व्या शतकात स्त्रिया स्वत:च स्थान तर बनवत आहेत पण त्याचबरोबरीने त्यांना स्वत:चे स्थान मिळविण्यासाठी आवाहनांचाही सामना करावा लागत आहे.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ :**

सामाजिक आर्थिक राजकीय क्षेत्रात निर्णय घेण्याच स्त्रीचे वैयक्तिक पातळीवरचे स्वातंर्त्य म्हणजे महिला सक्षमीकरण असा अर्थ घेतला जाऊ शकतो, हे सक्षमीकरण स्त्रियांनी शिक्षण घेऊन साध्य करता येईलच पण त्याचबरोबर स्त्रियांचा समाजकारण, राजकारण, अर्थकारण यात सहभाग वाढवून के साध्य होईल त्यासाठी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक: व्हायला हवा.

समाजात चाललेल्या रूढी परंपरांच्या ओझ्याचे गाठोडे जसेच्या तसे पुढच्या पिढीला न देता त्यातील जुन्या विचाराच्या चिंध्या बाजूला सारून नवीन विचारांची वस्त्रे पुढच्या पिढीला द्यायला हवीत. तेंव्हा सक्षमीकरणाला अर्थ प्राप्त होईल.

राजकारणात स्त्रियांनी फक्त निवडून येणे यापलीकडे कारभार पतीकडे न सोपावता स्वत: कारभार पाहायला हवा. अर्थकारणात सहभागी होताना बचतीच्या पलीकडे जाऊन उद्योग उभारावे आणि इतर चार लोकांना रोजगाराची संधी निर्माण करून देण्यापर्यंत सक्षम व्हावे.

**सक्षमीकरणातील महत्त्वाचे मुद्दे :**

**महिला शिक्षण :**

एकविसाव्या शतकात वावरताना शिक्षण ही मूलभूत गरज आहे. २०११च्या जनगणनेनुसार भारतात स्त्री साक्षरता ६४.६ टक्के आहे. काही स्त्रियांना शिक्षण अर्धवट सोडावे लागत असल्याने पुढील संधी नाकारल्या जात आहेत.

**महिला आरोग्य :**

आरोग्य संपत्ती आहे. स्त्रियांचे आरोग्य चांगले असणे अधिक महत्त्वाचे आहे. स्त्री पुढच्या पिढीला जन्म देत असते. आणि त्याचबरोबर इतर जबाबदारीही पार पाडत असते. २१व्या शतकातील स्त्रिया सक्षम होण्यासाठी त्यांनी चांगला चौरस आहार घेणे. व्यायाम करणे मानसिकदृष्ट्या सुदृढ असणे गरजेचे आहे.

**महिला सुरक्षा :**

भारतीय संविधानात कायदे करून स्त्रियांना सुरक्षा देण्याचा प्रयत्न केला आहे कायदे कितीही कडक असले पण त्याची अंमलबजावणी तितकीच कठोर असायला हवी ती होताना दिसत नाही.

२००२ मध्ये बिलकीस बानो गैंगरेप प्रकरण, २०१२ दिल्ली निर्भया हत्याकांड या ठळक घटना पाहता कायद्याने महिलेला पुरवलेली सुरक्षा कागदावर राहते महिला सक्षम होण्यासाठी तिच्या वाटेतील अडथळे दूर व्हायला हवेत. यासाठी महिला सुरक्षा हेल्पलाईन आहे- she box कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण तक्रार ऑनलाइन वेबपोर्टल आहे. पण प्रत्यक्ष घटना आणि तक्रार नोंदणी यात तफावत आहे. जगभरात 'हॅश मी टू' मोहीम राबवली गेली.

**महिला आणि माध्यमे :**

समाजमाध्यमात सुंदर आणि गोरी स्त्री ही आकर्षणाचा विषयबिंदू ठरते. एखाद्या पुरुषांच्या च्या जाहिरातीत स्त्रियांना का दाखवायचं fair and lovely ने ७ दिवसात गोरा करून दाखवायचं हे चित्र बदलून

अलीकडच्या समाजमाध्यमात तसा बदल दिसतोय.

माध्यमामध्ये महिलांना नोकरीच्या संधी आहेत पण एक स्त्री म्हणून माध्यमे कोणत चित्र समाजासमोर ठेवतात हे ही महत्वाचे.

**२१ व्या शतकातील सक्षमीकरण :**

सावित्रीबाई फुलेंनी महिलांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. विसाव्या शतकातील महिला शिक्षण घेऊ लागल्या होत्या याच काळात संविधान निर्माण झाले.

हिंदू कोड बिल हे विसाव्या शतकात महिलांना स्वत:चे हक्क मिळवुन देण्यासाठी मांडले त्यातील बाबी टप्याटप्याने लागू झाल्या. २१ व्या शतकाच्या शेवटी विशाखा प्रकरण गाजले यामुळे कामाच्या व व्यवसायाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणापासून मुक्ती मिळाली.

**२१व्या शतकातील महिला सक्षमीकरण :**

सक्षमीकरण म्हणजे आर्थिक राजकीय सामाजिक बाबतीत स्त्रियांना सशक्त करणे होय. याबाबत विचार करताना समाजातील २ गटातील स्त्रियांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. ते गट पुढीलप्रमाणे :

- ग्रामीण महिला सक्षमीकरण
- शहरी महिला सक्षमीकरण

आधीच्या काळात ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रीयांचे जीवन अत्यंत हलाखीचे होते. त्यातही रोजदारीवर जाणाऱ्या स्त्रियांचे चित्र फारच विदारक होते.

२१ व्या शतकात ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलींचे शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे कृषीच्या पलीकडे थोडेसे जग त्यांना खुले झाले.

शहरी भागातील महिला सशक्तीकरण करताना त्यांना स्वयंरोजगार संधी निर्माण करून द्यायला हव्या. ग्रामीण व शहरी भागात बचत गटाच्या माध्यमातून सक्षमीकरणाचा प्रयत्न झाला त्याचबरोबर शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा महिला सक्षमीकरणाला हातभार लागला आहे.

**महिला सक्षमीकरणातील बदलते स्वरूप :**

Empower women, empower huminity या पद्धतीने २१व्या शतकातील महिला सक्षमीकरणाची वाटचाल सुरू आहे. शांतता, लिंग समानता, निर्णय प्रक्रियेतील महिला आणि हिंसा, भविष्यातील वेध, समान संधी अशा थीम चा समावेश २१ व्या शतकात झालेला दिसतो. ८मार्च हा फक्त जागतिक पातळीवर महिलांचा विचार न होता राष्ट्रीय प्रादेशिक स्थानिक पातळीवरही विविध प्रश्नांवर चर्चा होताना दिसते. २१व्या शतकात सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे अगदी रिक्षाचालकापासून ते आकाशात उड्डाण घेईपर्यंत सर्वत्र योगदान आहे. संसदेत यावेळेस सर्वाधिक महिला आहेत. अनेक गावच्या सरपंच स्त्रिया आहेत. अनेक कंपनीच्या उएज महिला आहेत.

अगदी तरीही आजही जागतिक आकडेवारी तपासली असता महिलांच्या स्थिती आणि दर्जामध्ये म्हणावा तसा बदल दिसत नाही. प्रत्येक दिवशी ८०० महिला गर्भारपण व बाळंतपण या संबंधित कारणांमुळे मृत्यू पावतात. यापैकी ९९% महिला या विकसनशील देशात आहेत. आजही महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागते.

२१व्या शतकातील महिला सक्षमीकरणाचे स्वरूप बदलत आहे. विषमता हा मुद्दा ध्यानात घेतला तर, उच्च विद्याविभूषित स्त्रियांना अनेक चांगल्या संधी मिळाल्या आहेत. माणूस म्हणून वेगवेगळ्या आवाहनांना त्या सामोरे जात आहेत. स्वत:चे आयुष्य सुख दु:खाच्या समान वातावरणात जगत आहेत. पण व्यसनाधीनता ही स्त्रियांमध्ये दिसून येत आहे. काहीजणी चुकीच्या आचरणालाही बळी पडत आहेत. २१व्या शतकात

Research Hub International Journal

स्त्रियांच्या आनंदाच्या संकल्पना बदलत आहेत पण हे बदल काहीच जणींच्या आयुष्यात घडत आहेत पण अजूनही स्त्री भृणहत्या, असमानता, शारीरिक आणि लैंगिक शोषण, शिक्षण अर्धवट सोडावे लागणे या समस्यांनीही त्यांची पाठ सोडली नाही हे फारच भयानक आहे.

अगदी सुशिक्षित स्त्रियांही आपली मते ठामपणे मांडत नाही. प्रत्येक निर्णय कुणाच्यातरी दबावाखाली घेणे. मोठमोठ्या कंपनीच्या स्त्री संचालकांची संख्या कमी असणे हे ही दिसते. पर्यावरणाच्या बाबतीत ते वाचविण्यासाठी स्त्रिया प्रयत्न करताना दिसून येतात. ग्रेटा थनबर्ग स्वीडिश विद्यार्थीनी हवामानासाठी शाळाबंदी करून निर्देशने करते. पर्यावरण वाचवण्यासाठी स्त्रिया सक्षमपणे आपल्या मोहिमा राबवितात. भारतात मेधा पाटकर नर्मदा बचाओ आंदोलन उभारतात.

२१ व्या शतकातील स्त्रियांनी काळाप्रमाणे आपली पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. खेळात तर पुरुषांची मक्तेदारी असते. पण सेरेना विल्यम, मारिया शारापोवा, पी. व्ही. सिंधू, मेरी कोम या व इतर अनेक महिला खेळाच्या माध्यमातून सशक्त होऊन सक्षमीकरण करत आहेत.

**स्त्री सक्षमीकरणाचे जागतिक प्रयत्न :**

जगाची महासत्ता अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरीस, न्यूझीलंडच्या जेस्सीना, IMF या जागतिक संघटनेचे मुख्य आर्थिक सल्लागार गीता गोपीनाथ आहेत. जगातील मानाच्या स्थानावर या महिला आहेत. त्याचबरोबर मंगळ्यानासारख्या अवकाश मोहिमेत महिलांचा सहभाग आहे. पण त्याचवेळी अमेरिका महिलांना गर्भपाताचा अधिकार नाकारते भारत. आफ्रिकेसारख्या देशात महिला अजूनही ऍनिमियाग्रस्त आहेत हे दिसते.

जागतिक स्तरावर महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी आणि अधिकारांसाठी काम करताना ही आंतराष्ट्रीय संघटना मुख्य भूमिकेत दिसून येते. महिलांच्या स्थितीवर आयोग त्यांची धोरणे जागतिक मानके मानदंड तयार करण्यास ही संस्था मदत करते.

**स्त्री सक्षमीकरणाचे भारतातील प्रयत्न :**

स्त्रियांना सक्षम करायच म्हणजे नेमके काय? तेही भारतासारख्या विकसनशील देशात जिथं अजूनही काही प्रमाणात तिचा जन्मदेखील नाकारला जातो.

स्त्रिया सक्षम होण्यासाठी आर्थिक सामाजिक राजकीय जीवनात त्यांचा वावर वाढवला पाहिजे यासाठी भारतात शासन स्तरावर प्रयत्न होत आहेत. बचत गटाच्या माध्यमातून अनेक छोट्य मोठ्य उपक्रमातून योजनांतून त्यांना आर्थिक प्रक्रियेत सहभागी होता येते. विधवा विवाह प्रथाबंदी अनेक गावात सुरु होऊन विधवांचा सामाजिक दर्जा वाढवला जातोय. महिलांना आरक्षण दिले आहे जेणेकरून त्यांना राजकारणात संधी वाढवल्या जातात. स्त्रियांसाठी केंद्र स्तरावर राज्य स्तरावर अनेक उपक्रम आखले जातात. अनेक सोयीसुविधा त्यांच्यापर्यंत पोचवल्या जातात आरोग्य सोयी महिलांपर्यंत पोचवण्यासाठी आशा सेविका काम करतात. अशा प्रकारे भारतात स्त्री सक्षमीकरण चालू आहे.

**२१ व्या शतकातील स्त्रियासमोरील आव्हाने :**

२१ व्या शतकात स्त्री फक्त उपभोग्य साधन नाही या शतकातील स्त्री शिक्षण घेते पण त्यापैकी बऱ्याच जणींच्या वाट्यला ते अर्धवट सोडण्याचीही वेळ येते. स्त्रियांसाठी आरक्षण आहे. आरक्षित जागावर स्त्रिया निवडणून येतात पण कारभार पुरुष चालवताना दिसतात. स्वत:ला मिळालेल्या राज्यकारभार करण्याच्या अधिकाराचा वापर करणे हे तिच्यासमोरील आवाहन आहे.

स्वसंरक्षण करणे, शिक्षण पूर्ण करणे, स्वत:चे करियर घडवणे, कुटुंबाच्या जबाबदारी पार पाडणे, समाजात आत्मविश्वासाने वावरणे, स्वत:ची मते ठामपणे मांडणे, चुकीच्या आचरणाला दूर ठेवणे, पुढच्या

पिढीला घडवण्याचे शिवधनुष्य पेलणे ही आजच्या स्त्रीसमोरील काही आवाहनांपैकी काही आवाहन आहेत.

**निष्कर्ष :**

२१ व्या शतकातील बदलते स्वरूप लक्षात घेताना पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

२१ वे शतक तंत्रज्ञानाचे व जलद बदलाचे युग आहे. या बदलत्या काळानुसार स्त्रियांचे जगणेही बदलत असल्याचे निष्पन्न होते.

- स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाने मोठा हातभार लावल्याचे दिसते.
- समाजात स्त्रियांनी आत्मनिर्भतेने वावरल्यास समाज तिचे नेतृत्व स्वीकारत असल्याचे दिसते पण हेच नेतृत्व सहजपणे मान्य होत नाही तर त्यासाठी तिला संघर्ष आहेच.
- राजकीय आरक्षणाने स्त्रियांचा राजकारणात सहभाग वाढला आहे. घक्त व्या निवडणुकीत संसदेत महिलांची संख्या सर्वाधिक आहे
- आर्थिकदृष्टीने सक्षम होण्यासाठी शासकीय योजना, उपक्रम, स्वयंरोजगार उपक्रम उपयोगी उपयोगी

या प्राप्त निष्कर्षावरून २१ व्या शतकातील स्त्रियांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रगती केलेली दिसून येते पण सक्षमीकरण हे काही स्त्रियांसाठी मर्यादित न राहता तळागाळापर्यंत पोचले पाहिजे हे या संशोधनावरून निष्पन्न होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- रंजन कोळंबे (२०२०) भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे.
- डॉ. सुधीर रशिंगकर (एप्रिल २०२२) महिलांनो व्हा. उद्योजक बना. उद्योजक मासिक, महाराष्ट्र उद्योजक विकास केंद्र प्रकाशन, औरंगाबाद.
- जयदीप भटनागर, मार्च २०२२, स्त्री शक्ती, न्यू इंडिया समाचार, अंक–१७, सत्येंद्र प्रकाश प्रकाशन, नवी दिल्ली.
- प्रा. वृषाली गागरेपाटील (२०१६) महिला सबलीकरण वास्तव व व्यथा, महाराष्ट्र टाइम्स.
- प्रमिला गोस्वामी (२०१५) महिला सक्षमीकरण देशाचे सबलीकरण, प्रहार,
- डॉ. सुनिलकुमार लबटे : महाराष्ट्रातील महिला व बालकल्याण: दशा आणि दिशा, अक्षर दाहन, कोल्हापूर, (प. आ.), जानेवारी २०१४
- डॉ. जया सागडे : स्त्री न्याय कायदा, चंद्रकला प्रकाशन, पुणे (प. आ.), एप्रिल १९९८
- डॉ. सरोजिनी बाबर : स्त्रीशिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालयातर्फे प्रकाशित, १ मे १९६८.
- मंगला सामंत : स्त्री पर्व, सुगावा प्रकाशन, पुणे, (प. आ.), ८ मार्च २०००
- प्रतिभा रानडे : स्त्री प्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, (दु. आ.), १९९२


Research Hub International Journal